# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय
## ता.सावंतवाडी

ई-मेल - tmosawantwadisindhu@gmail.com


जा.क्र.ताआअका/दरपत्रक नोटीस/ 563 /२०२६, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ता.सावंतवाडी, दिनांक - ०६/०१/२०२६ 07

## दरपत्रक नोटीस

आमच्या सावंतवाडी तालुक्यातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक 129 व प्रा.आ.केंद्र तसेच उपकेंद्र स्तरावरील आरोग्य कर्मचारी (अंदाजे 170 कर्मचारी) यांचेकडील कर्मचारी यांचे दरपत्रक मंजुर दिनांकापासुन ते 31 मार्च 2026 पर्यंत प्रशिक्षण कार्यक्रम व तालुकास्तरीय आढावा मिटिंग, तसेच या कार्यालयाकडुन आयोजीत करणेत आलेल्या इतर कार्यक्रम आयोजीत करणेत येणार आहेत. तरी सदरच्या प्रशिक्षण व इतर कार्यक्रमासाठी खालील प्रमाणे शाकाहारी जेवण, नाश्ता व चहा याची प्रशिक्षणाच्या ठिकाणी व्यवस्था करणेची आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | शाकाहारी जेवण (पुरी/चपाती ४ नग, भात, डाळ, कुर्मा, कोशिंबिर, लोणचे, सोलकडी व श्रीखंड, इ.) | |
| २ | स्पेशल शाकाहारी जेवण (पुरी/चपाती ४ नग, भात, मसालेभात, डाळ, कुर्मा, कोशिंबिर, लोणचे, सोलकडी व गुलाबजामुन ४ नग, इ.) | |
| ३ | नाश्ता पोहे/उपमा/पाव भाजी ( तीन पाव, उसळ व भाजी) | |
| ४ | समोसा (प्लेटसह) | |
| ५ | वडा पाव | |
| ६ | चहा (कपसह) | |
| ७ | पुलावा (व्हेज) (अंदाजे पाव किलो) | |
| ८ | पाणी बॉटल (२० लिटर) | |

वरीलप्रमाणे शाकाहारी जेवण, स्पेशल शाकाहारी जेवण, नाश्ता व चहा प्रशिक्षणाच्या ठिकाणी स्वता पोहोच करणेचा आहे. तसेच प्रशिक्षण कार्यक्रम व इतर कार्यक्रमासाठी चहा, नाश्ता व शाकाहारी जेवण पोहोच करणेसाठी एक दिवस आधी पुर्वसुचना देणेत येईल. तरी वरील प्रमाणे चहा, नाश्ता व शाकाहारी जेवण पुरवणेसाठी इच्छुकाकडुन प्रत्यक्ष सिलबंद दरपत्रक, नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत, पॅन कार्ड झेरॉक्स प्रत इ. या कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत दिनांक 15/01/2026 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत किंवा जाहीर नोटीस शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन सात दिवसाच्या आत सादर करावीत. मुदतीनंतर आलेली दरपत्रक स्विकारली जाणार नाहीत.

मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

प्रत माहितीसाठी व प्रसिध्दिसाठी कार्यालयीन नोटीसबोर्ड

01) www.nrhm.maharashtra.gov.in

02) www.arogya.maharashtra.gov.in

**टिप- वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**

Scanned with CamScanner